जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १६८ दिनांक - १५/०३/२०२५**

लोणी काळभोर पोलीस स्टेशन पुणे शहर

## लोणी काळभोर पोलीस ठाणेकडील पोक्सो बलात्काराचे गुन्हयात आरोपी सचिन अशोक खराडे यास जिल्हा सत्र न्यायालयाने सुनावली शिक्षा

लोणी काळभोर पोलीस ठाणेकडील गु.र.नं.८५५/२०१७ भां.दं.वि.क.४५२,३५४,३७६(२)(आय) पोक्सो३(ब), ४, ५(एम), ६, ८ मधील आरोपी **नवनाथ अशोक खराडे वय २६, उरुळी कांचन, तुपे वस्ती, मुळ गाव भोगेवाडी, ता. म्हाडा, जि. सोलापुर** याने दि. ०३/१२/२०२७ रोजी उरुळी कांचन, तुपे वस्ती, ता.हवेली, जि. पुणे येथे दाखल गुन्हयातील फिर्यादी यांची मुलगी (निर्भया) ही घरामध्ये भांडी धुवत असताना आरोपीने फिर्यादी यांचे घरामध्ये घुसुन फिर्यादी यांचे मुलीस (निर्भया) घट्ट पकडुन तीचेशी तीचे इच्छेविरुध्द जबरीने शरिरसंबंध केले.सदर बाबत लोणी काळभोर पोलीस ठाणेस वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करणेत आला होता.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्रीकांत इंगवले यांनी केला व आरोपी विरुध्द विहीत मुदतीत मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्याचा स्पेशल सेशन केस नंबर १०१/२०१८ असा आहे.

सदर केसमध्ये आरोपीस सबळ पुराव्याअंती मा. जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांनी दि. १५/०३/२०२५ रोजी भा.दं.वि.क. ३५४ मध्ये १ वर्षे कारावास व ५०००/- रुपये दंड, भा.दं.वि.क. ४५२ मध्ये ५ वर्षे सश्रम कारावास व १०,०००/- रुपये दंड तसेच पोक्सो कायदा कलम ६ अन्वये १० वर्षे कारावास व १०,०००/- रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सरकारी पक्षातर्फे सरकारी वकिल श्री नितीन कोंघे, कोर्ट पैरवी श्रीमती ललीता कानवडे, लोणी काळभोर पोलीस ठाणे पुणे शहर यांनी कामकाज पाहिले आहे. सदर कारमगिरी करीता प्रोत्साहन म्हणुन मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर डॉ. राजकुमार शिंदे यांनी कोर्ट पैरवी महिला पोलीस अंमलदार ललीता कानवडे व नमुद गुन्हयाचे तपासी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक श्रीकांत इंगवले यांना १०,०००/- रुपये बक्षीस मंजुर केले आहे.